नियमित दिवाणी दावा क्र.२२/२०१०

गजानन साबळे –विरुद्ध– विठ्ठल राठोड

निशाणी क्र.८५ लगत निरंतर

**विठ्ठल राठोड यांची उलटतपासणी वादी यांचे विव्दान वकील श्री. इ.बी. ठाकरे यांच्या व्दारे**

वादी गजानन साबळे यांच्या वादी व मालकतील सर्वे ४३/२ क्षेत्रफळ ०.३७ या मधील जमीन माझ्या पाहणीतील आहे. वादी गजानन यांनी खरेदीखताआधारे किती लोकांना शेतजमीन विक्री केली हे मला माहिती नाही. त्यांनी ५० किवा १०० रु. मुद्रांकावर किती लोकांना शेतजमिन विक्री केली यांची मला माहिती नाही. सन १९९८ मध्ये मी सिंदखेड राजा येथे नोकरीस होतो. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०२/११/१९९८ रोजी प्रतिवादी क्र. २ छबुराव सातपुते यांनी २ गुंठे शेजमिन घेतली, त्या खरेदीखताच्या वेळी मी हजर नव्हतो. त्यामधील चतुःसिमेबद्दल मला माहिती नाही. प्रतिवादी क्र. २ छबुराव यांनी त्या २ गुंठे जमिनीचा ताबा घेतला, त्या वेळी मी हजर नव्हतो. त्या व्यवहाराच्या वेळी मोबद्दला रक्कम देतांना मी हजर नव्हतो. वादी गजानन यांनी वर्षे २००१ मध्ये १ गुंठा जमिन विक्री काढली त्या सौदयाच्या वेळी मी हजर नव्हतो. सन १९९८ मध्ये मी विस्तार अधिकारी या पदावर होतो. सन २००१ मध्ये मी बि.डी.ओ या पदावर होतो. हे म्हणणे खरे आहे की, सन २००१ मध्ये गुंठेवारी पध्दतीने खरेदी विक्री होत होती किंवा कसे याबद्दल मी माहिती काढली नाही.

**प्रश्न –** १०० रु. मुद्रांकावर लिहलेल्या विक्री पत्राआधारे फेरफार होत नाही.

**उत्तर–** फेरफार झाला आहे.

सदर १ गुंठा विक्रीच्या वेळी मी हजर नव्हतो. तीन गुंठ्याचे किती क्षेत्रफळ होते हे मी सांगू शकत नाही. मी तीन गुंठे जमिनीचा प्लॉट घेतला आहे, माझ्या खरेदीखतात किती क्षेत्रफळ लिहले आहे हे मी पाहिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या खरेदी खतातमध्ये पूर्वे–पश्चिम ६० व दक्षिण–उत्तर ६० लिहलेले आहे, त्याचे गणित मी सांगू शकत नाही. ३३ x ३३ फुटाचा एक गुंठा होतो. त्याचे किती क्षेत्रफळ होते हे मी सांगू शकत नाही. तीन गुंठाचे फुटात किती क्षेत्रफळ होते हे मी सांगू शकत नाही. एका गुंठाचे क्षेत्रफळ १ हजार ८९ फुट होते असते. हे म्हणणे खरे आहे की, ३६०० sq. Ft लिहले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी ३ गुंठापेक्षा जास्त जमिन खरेदीखतता लिहून घेतली. त्या ३ गुंठे जमिनीचे मी अक्रशित रुपांतर केले नाही. सदर ३ गुंठे जमिनीपैकी किती क्षेत्रावर मी बांधकाम केले हे आता निश्चित सांगू शकत नाही. हे मला माहिती आहे की, घराचे बांधकाम झाल्यास नगरपालिकेकडून परवानगी घेणे आवश्यक असते. हे म्हणणे खरे नाही की, मी बांधकामास परवानगी घेतलेली नाही. मी बांधकाम परवानगी दाखल करू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. २ छबुराव सातपुते काय व्यवसाय करत होते हे मला माहिती नाही. हे मला माहिती नाही की, तो शावकारी व्यवसाय करीत होता किंवा कसे. हे मला माहिती नाही की, वादी गजानन साबळे यांच्याकडून ५,०००/– रू. शावकारी व्यवरातुन प्रतिवादी क्र. २ छबुराव सातपुते यांनी खरेदी खत करून घेतलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, वादी यांनी प्रतिवादी क्र. २ छबुराव सातपुते यांनी ३ गुंठे जमिनीचा ताबा दिलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मला ३ गुंठे जमिनीचा ताबा प्रतिवादी क्र.२ छबुराव सातपुते यांनी दिलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या नावाने महसूल अभिलेखक झाले म्हणून मी ताबा करायाल गेले होतो. मी घराचे धाबंकाम वर्ष २००९ मध्ये

केले. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराचे बाधंकाम वादी गजानन व अन्नपूर्णा यांनी आडवले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी बांधकाम थांबविले नसल्यामुळे वादी यांनी हा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे आहे की, दावा प्रलंबित असताना मी बाधंकाम पूर्ण केले. हे म्हणणे खरे नाही की, खरेदी खतामध्ये नमुद केलेल्या चतुःसिमाच्या आत मी बाधंकाम केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वादी याच्या मिळकतीवर बेकायदेशीररित्या अतिक्रमण करून बांधकाम केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखतामध्ये नमुद केलेल्या क्षेत्रफळापेक्षा जास्त क्षेत्रफाळावर बांधकाम केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, एका गुंठयात किती sq. Ft असता हे माहित असून सुध्दा मी मुद्दाम सांगत नाही. हे म्हणणे खरे नाही की, ६० x ६० चे किती फुट होतात हे माहित असून मी सांगत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटा जबाब देऊन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by SHINDE SATISH GANESHRAO Date: 2025.11.27 14:50:36 +0530

स्थळ–सिंदखेड राजा (सतिश ग. शिंदे)

दि.२६/११/२०२५ दिवाणी न्यायाधीश (क–स्तर), सिंदखेड राजा